N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चाळीसगांव **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0270 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/06/2022 01:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 28/06/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/06/2022

**Time From (वेळेपासून):** 19:03 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:13 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/06/2022 **Time (वेळ):** 00:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2022 00:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** चाळीसगाव शहरातील मनमाड चौफुली, वरील शिवाजी महाराज चौकात ,सार्व जागी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** पांडुरंग पितांबर पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

13.Action (केलेली कारवाई

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोरया नगर, प्लट नं 17,धुळे रोड, चाळीसगाव,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोरया नगर, प्लट नं 17,धुळे रोड, चाळीसगाव,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल रामचंद्र अिहरे | | | 1. वैष्णवी पार्क प्लट नं 04 ,धुळे रोड, चाळीसगाव,मुळ राहणार खेडी खेडगाव , ता चाळीसगाव ,चाळीसगांव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | शैलेंद्र आत्माराम पाटील | | | 1. वैष्णव पार्क तेजस कोनार्क,धुळे रोड, चाळीसगाव,चाळीसगांव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 270/2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन1988 चे कलम 7, 12 प्रमाणे फिर्यादी - पांडुरंग पितांबर पाटील वय 55 वर्षे धंदा खाजगी वाहन चालक रा. मोरया नगर, प्लट नं. 17 धुळे रोड, चाळीसगाव जि. जळगाव आरोपी - 1) अनिल रामचंद्र अिहरे वय 51 वर्षे धंदा नोकरी सफौ 2727 नेम. चाळीसगाव शहर पो. स्टे. रा. वैष्णवी पार्क प्लट नं. 04 धुळे रोड, चाळीसगाव जि. जळगाव मुळ राहणार खेडी खेडगाव ता. चाळीसगाव पोलीस खाते वर्ग-3 ) शैलेंद्र आत्माराम पाटील वय 38 वर्षे धंदा नोकरी पोना 744 नेम. चाळीसगाव शहर पो. स्टे. रा. वैष्णव पार्क तेजस कोनार्क धुळे रोड, चाळीसगाव जि. जळगाव पोलीस खाते वर्ग-3 अप.घ.ता.वेळ व ठिकाण दि. 28/06/2022 रोजी 19.03 वाजता चाळीसगाव शहरातील मनमाड चौफुली वरील शिवाजी महाराज चौकात सार्व. जागी गुन्हा दाखल ता. वेळ दि. 29/06/2022 रोजी 00.30वाजता लाचेची मागणी रक्कम- प्रथम 5000/- रुपये व तडजोडी अंती 4000/- रुपये स्विकारली रक्कम - 4000/- रुपये (त्यात 500 रुपये दराच्या 08 चलनी नोटा) अ. पा. लावलेल्या सापळा व तपास अधिकारी - एस. एन. जाधव पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव खुलासा - यातील फिर्यादी यांच्या मुलीने दि. 19/03/2022 रोजी चाळीसगाव शहर पो. स्टे. येथे तिचे पती व सासर कडील आठ नातेवाईक यांचेविरुध्द फिर्याद दिल्यावरुन गुरन 113/2022 भादवी कलम 498 अ, 406, 323 वैगेरे कलमान्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास आ. क्र. 01 हे करीत होते. फिर्यादी हे सदर गुन्ह्याचा तपासाबाबत विचारपुस करण्यासाठी चाळीसगाव शहर पो. स्टे. ला गेले असता आ. क्र. 01 व 02 यांनी फिर्यादीस तुमच्या मुलीने दाखल केलेल्या गुन्ह्यात तुम्हाला योग्य ती मदत करुन गुन्ह्याचा तपास लवकरात लवकर तुमच्या बाजुने करतो तसेच आरोपी विरुध्द कोर्टात तात्काळ चार्जशिट दाखल करुन देतो असे सांगुन 5000/- रुपये लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि. 28/06/2022 रोजी ला. प्र. वी. जळगाव कार्यालयाकडील लेखी तक्रार केली होती. सदर तक्रारीची दि. 28/06/2022 रोजी ला. प्र. वी. जळगाव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र. 1 व 2 यांनी फिर्यादी यांच्या मुलीने दाखल केलेल्या गुन्ह्यात योग्य ती मदत करुन चार्जशिट दाखल करण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस प्रथम 5000/- रुपये व तडजोडी अंती 4000/- रुपये लाचेची मागणी केली त्यानंतर सदर लाचेची रक्कम आ. क्र. 02 यांचे उपस्थितीत आ. क्र. 01 यांनी वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा.

13. Action (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): kantilal kashinath patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Patil

पोलीस निरीक्षक चाळीसगांव शहर पो. स्टे. (जळगांव) सत्यमेव जयते

Sonawane
पो. ड. अंमलदार
चाळीसगांव शहर पो. स्टे. जि. जळगांव

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): kantilal kashinath patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

फिर्याद

चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन
दिनांक २९.०६.२०२२

**मी पांडुरंग पितांबर पाटील, वय ५५ वर्षे, व्यवसाय खाजगी वाहन चालक रा.मोरया नगर, प्लॉट नं.१७, धुळे रोड,चाळीसगांव जि. जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी व मुलाबाळांसह राहतो.मी खाजगी वाहन चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. दि.२७.०६.२०२२ रोजी दुपारी मी जळगांव अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री. एस.एस.पाटील साहेब यांचेशी मोबाईल फोनवर संपर्क साधुन चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथील हेड कॉन्स्टेबल अनिल अहिरे व पोलीस कर्मचारी शैलेंद्र पाटील यांचे विरुध्द लाचे सबंधी तक्रार असल्याचे कळविले होते. तेव्हा पाटील साहेब यांनी मला आमचे अधिनस्त पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव किंवा पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव यांना कळवितो. त्यांचा आपणास फोन येईल तेव्हा त्यांच्याशी आपण बोलणी करावी असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने मला पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव यांचा फोन आला. तेव्हा मी त्यांना माझी तक्रार सांगितली व मी दि.२८.०६.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता आपणास चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.२८.०६.२०२२ रोजी सकाळी ११.३० वा.मी माझे स्वत:चे होन्डा युनिकॉन कंपनीची मोटार सायकल क्र.एम.एच१९.ए.व्ही.००४९ सह चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात उपस्थित होतो. तेव्हा एक सिल्वर रंगाचे खाजगी तवेरा वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात बसलेले एक पुरुष अधिकारी व महिला अधिकारी यांनी मला माझे नाव गाव विचारले व मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर सदर पुरुष अधिकारी यांनी पोलीस निरीक्षक एस. के.बच्छाव असल्याची ओळख करुन दिली व महिला अधिकारी यांनी एन.एन.जाधव अशी स्वत:ची ओळख सांगुन सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वत:चे हस्ताक्षरात को—या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

माझी मुलगी नामे सौ.स्नेहल हिचा विवाह दि.१२.१२.२०१९ रोजी प्रशांत युवराज पाटील रा.चोपडा, पाटीलगढी ता.चोपडा जि.जळगांव यांच्याशी रितीरिवाजाप्रमाणे झाला आहे. माझे मुलीस तिचे पती व सासरकडील मंडळी हे शारीरीक व मानसिक त्रास देवुन छळ करीत असल्याने व मारहाण करीत असल्याने माझी मुलगी माझेकडेस रहावयास आलेली आहे. माझे मुलीने दि.१९.०३. २०२२ रोजी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे तिचे पती प्रशांत पाटील व सासरकडील इतर ०९ नातेवाईक यांचे विरुध्द फिर्याद दिल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा रजि.नं.११३/२०२२ भादवि कलम ४९८ अ, ४०६,३२३ वगैरे कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल अनिल अहिरे यांचेकडेस देण्यात आला आहे.

त्यानंतर सुमारे १०/१२ दिवसापुर्वी मी हेड कॉन्स्टेबल अनिल अहिरे यांची चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे जावुन भेट घेतली. तेव्हा त्यांचे सोबत काम करणारे त्यांचे सहकारी पोलीस कर्मचारी शैलेंद्र पाटील हे देखील हजर होते. तेव्हा मी अनिल अहिरे यांना माझ्या मुलीने दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाबाबत विचारपुस केली. तेव्हा अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील हे मला पोलीस स्टेशन समोरील आवारात घेवुन गेले. त्यानंतर अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांनी मला सांगितले की, तुमच्या मुलीने दाखल केलेल्या गुन्हयात तुम्हाला योग्य ती मदत करुन गुन्हयाचा तपास लवकरात लवकर व तुमच्या बाजुने करतो. तसेच आरोपींविरुध्द कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करुन देतो. परंतु त्यासाठी आम्हाला तुम्ही ५,०००/—रु.आणुन द्या असे सांगितले. तेव्हा मी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना पुर्ण ५,०००/—रुपये द्यावे लागतील का? असे विचारले असता अनिल अहिरे यांनी सांगितले की, तुम्ही अगोदर पैसे घेवुन या तेव्हा आपण पाहु असे सांगितले.

त्यावेळी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील हे माझे मुलीने दाखल केलेल्या गुन्हयात योग्य ती मदत करुन गुन्हयाचा तपास लवकरात लवकर व आमच्या बाजुने करण्यासाठी तसेच आरोपींविरुध्द कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करण्याच्या मोबदल्यात ५,०००/—रु. लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगितले तेव्हा अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांनी मला तुम्ही पोलीस स्टेशनलाच येवुन भेटा असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून निघुन आलो आहे.

माझे मुलीने दाखल केलेल्या गुन्हयात योग्य ती मदत करुन गुन्हयाचा तपास लवकरात लवकर व आमच्या बाजुने करण्यासाठी तसेच आरोपींविरुध्द कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करण्याच्या मोबदल्यात ५,०००/—रु. लाचेची रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना त्यांच्या मागणी प्रमाणे ५०००/—रु. लाचेची रक्कम दिली नाही तर ते माझे मुलीने दाखल केलेल्या गुन्हयाचा तपास व्यवस्थीत करणार नाही तसेच आरोपींविरुध्द कोर्टात चार्जशीट दाखल करण्यास विलंब करतील म्हणुन मी नाईलाजाने अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना ५०००/—रु. लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. मी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची भेट घेण्यास चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे दि. २८.०६.२०२२ रोजी जाणार आहे.बाबत तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम यांनी सापळा पथकातील पोकॉ.नासीर देशमुख यांचे जवळील बॅगेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन दाखविले. त्यामध्ये पोकॉ.नासीर देशमुख यांनी नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल अहिरे व .

चाळीसगांव शहर पो.स्टे. गु.र.न २००/२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.नं. २ वर ००:३० वा दाखल आहे.

(signature)
पो. ठा. अंमलदार
चाळीसगांव शहर पो.स्टे.
जि. जळगांव

(signature) (signature)

पोलीस कर्मचारी शैलेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या बाहेर गेलो.त्यानंतर मी माझी मोटार सायकल चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनचे बाहेर उभी केली. त्यानंतर मी माझे मोबाईल फोन क्रं.९८६०६२२९५३ यावरुन अनिल अहिरे यांचे मोबाईल फोन क्रं.९५४५९२२८२७ यावर कॉल केला व माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. तेव्हा मी अनिल अहिरे यांना तुम्ही कोठे आहेत? असे विचारले तेव्हा त्यांनी मी पोलीस स्टेशनमध्ये आहे, तुम्ही या असे सांगितले.त्यामुळे मी व पंच क्रं.१ असे चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा सदर पोलीस स्टेशनमध्ये अनिल अहिरे किंवा शैलेंद्र पाटील हे दिसुन आले नाही. म्हणुन मी व पंच क्रं.१ असे पोलीस स्टेशनच्या बाहेर आलो व माझा मोबाईल फोनवरुन अनिल अहिरे यांचे मोबाईल फोनवर पुन्हा कॉल केला व माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. तेव्हा मी अनिल अहिरे यांना मी पोलीस स्टेशनला आलो असल्याचे सांगितले असता अनिल अहिरे यांनी मी बाहेर आहे, तुम्ही तेथेच थांबा, मी येतो असे कळविले. त्यामुळे मी व पंच क्रं.१ असे पोलीस स्टेशनमध्येच अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची मार्गप्रतिक्षा करीत थांबुन राहीलो.

त्यानंतर लागलीच अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील हे पोलीस स्टेशनमध्ये आले. तेव्हा मी, पंच क्रं.१ अशांनी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची भेट घेतली.तेव्हा अनिल अहिरे यांनी माझे मुलीने केलेल्या केस संदर्भातील कागदपत्रे मला दाखविले. तेव्हा अनिल अहिरे व माझेत माझे मुलीने दाखल केलेल्या केस संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर अनिल अहिरे, शैलेंद्र पाटील, मी व पंच क्रं.१ असे पोलीस स्टेशनच्या बाहेर असलेल्या एका हॉटेलवर गेलो. सदर ठिकाणी आम्ही सर्वांनी थंड ताक प्यायलो. त्यानंतर पुन्हा अनिल अहिरे व माझेत माझे मुलीच्या केस संदर्भात चर्चा झाली. तेव्हा अनिल अहिरे यांनी मला उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैश्यांचा इशारा केला व शैलेंद्र पाटील यांनी उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन इशारा केला. तेव्हा मी अहिराणी भाषेत तुम्ही सांगा कितला देवाणा, असे विचारले. तेव्हा अनिल अहिरे यांनी तुम्ही सांगितले ना, त्या दिवशी, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना किती द्यायचे, असे विचारले. तेव्हा अनिल अहिरे यांनी जवळच उभे असलेले शैलेंद्र पाटील यांना किती सांगितले होते, असे विचारले. तेव्हा शैलेंद्र पाटील यांनी आता मलाच याद पडुन गेली, मी किती सांगितले होते. तेव्हा अनिल अहिरे यांनी पाच सांगितले होते आम्ही,बरोबर, असे विचारले. तेव्हा मी त्यांना, पाच हजार सांगितले होते तुम्ही, असे सांगितले असता, अनिल अहिरे यांनी बरोबर आहे, मला आठवत ना, तुम्हाला काय दयायचे ते द्या, असे सांगितले. तेव्हा मी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना काही कमी जास्त, असे विचारले असता,अनिल अहिरे यांनी तुम्हाला जे वाटेल ते करा, असे तोंडाने बोलुन, त्यांच्या उजव्या हाताचे चार बोटे दाखवुन ४०००/–रु. लाच मागणी केली. तेव्हा शैलेंद्र पाटील यांनी देखील उजव्या हाताचे चार बोट दाखवुन ४०००/–रु.लाच मागणी करुन, उजव्या हाताने मिटवुन टाका, असा इशारा केला. तेव्हा मी त्यांना अहिराणी भाषेत ४०००/–रु.देईल मी, असे सांगितले. तेव्हा अनिल अहिरे यांनी ठिक आहे, मोडा, असे सांगितले व शैलेंद्र पाटील यांनी मानेने होकार दर्शवुन संमती दिली. तेव्हा मी त्यांना मुलगा आल्यावर मी येतो असे सांगुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी,एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथकाने ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व एन.एन.जाधव मॅडम यांची अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांनी लाचमागणी केले बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरीत्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली ४,०००/–रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराच्या ०८ चलनी नोटा) एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केली. तेव्हा एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावली. त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांनी सदर नोटांची घडी केली. त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी ४,०००/–रु.लाच रक्कम माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिली होती.

त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना ४,०००/–रु.लाच रक्कम देण्यासाठी माझे मोटार सायकलने चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्रं.१ यांचे सह माझे मोटार सायकलने चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या बाहेर गेलो. त्यानंतर मी माझी मोटार सायकल चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या बाहेर उभी केली. तेव्हा एन.एन.जाधव मॅडम यांनी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या आजुबाजुस सापळा लावला होता.

त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन अनिल अहिरे यांचे मोबाईल फोनवर कॉल केले. परंतु सदरचे कॉल अनिल अहिरे यांनी रिसीव्ह केले नाहीत. म्हणुन मी व पंच क्रं.१ असे पोलीस स्टेशनमध्ये गेलो. तेव्हा मला पोलीस स्टेशनमध्ये अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील हे दिसुन आले नाहीत. म्हणुन मी तेथे उपस्थित असलेल्या एका इसमास अनिल अहिरे यांचेविषयी विचारपुस केली. तेव्हा त्यांनी अनिल अहिरे हे सांयकाळी ०५.३० वाजेनंतर येतील असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सापळा पथकास कोणताही इशारा न करता माझे मोटार सायकलने चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात परत गेलो. तेव्हा आमच्या मागोमाग सापळा पथक देखील आले. तेव्हा मी एन.एन.जाधव मॅडम यांना अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची भेट झाली नसल्याचे तसेच अनिल अहिरे हे सांयकाळी ०५.३० वाजेनंतर पोलीस स्टेशनला येणार असल्याचे सांगितले. तेव्हा एन.एन.जाधव मॅडम यांनी सांयकाळी ०५.३० वाजेपर्यंत सदर ठिकाणीच थांबुन मार्गप्रतिक्षा करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा आम्ही सदर ठिकाणी थांबुन मार्गप्रतिक्षा केली.

Hitesal

Patil

त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमधील मेमरी कार्डमध्ये नविन फाईल तयार केली. त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार मी माझे मोबाईल फोनवरुन अनिल अहिरे यांचे मोबाईल फोनवर फोन लावला व माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी अनिल अहिरे व माझेत संभाषण झाले. तेव्हा अनिल अहिरे यांनी मला पोलीस स्टेशनला येण्यास सांगितले.त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचने नुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमधील मेमरी कार्डमध्ये नविन फाईल तयार करुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या बाहेर गेलो.त्यानंतर मी माझी मोटार सायकल चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनचे बाहेर उभी केली. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन अनिल अहिरे यांचे मोबाईल फोनवर कॉल केला व माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. तेव्हा माझे अनिल अहिरे यांचे सोबत संभाषण झाले. तेव्हा अनिल अहिरे यांनी मला चाळीसगांव शहरातील सिग्नल पॉईन्ट जवळ येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे माझे मोटार सायकलने चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनच्या बाहेरुन निघुन चाळीसगांव शहरातील सिग्नल पॉईन्टला म्हणजेच मनमाड चौफुलीवरील शिवाजी महाराज चौकात गेलो. तेव्हा सदर चौकातील एका बाजुला अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील हे त्यांच्या मोटार सायकल जवळ उभे होते. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे त्यांच्या जवळ गेलो. सदर ठिकाणी मोटार सायकल उभी केली. त्यानंतर मी व पंच क्रं.१ अशांनी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांची भेट घेतली. तेव्हा मी त्यांना चला चहा घेवु, असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण पायी–पायी चालत रस्त्याच्या पलीकडे रोडवर असलेल्या एका चहाच्या टपरी जवळ गेलो. त्यानंतर मी चहाची ऑर्डर दिली. तेव्हा माझेत व अनिल अहिरे यांचेत माझे मुलीचे केस संदर्भात चर्चा झाली. तेव्हा अनिल अहिरे यांनी त्यांचे उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैश्यांचा इशारा केला व शैलेंद्र पाटील देखील त्यांच्या उजव्या हाताचे चार बोटे दाखवुन ४,०००/–रु.आणले आहे का? असे इशा–याने विचारले. तेव्हा मी माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली ४,०००/–रु.लाचेची रक्कम उजव्या हाताने बाहेर काढुन ती अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांचे समोर धरली व तुम्ही सांगितल्याप्रमाणे ४,०००/–रु. आहेत असे सांगितले. तेव्हा अनिल अहिरे यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे सफारी ड्रेसवरील शर्टचे वरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा एन.एन.जाधव मॅडम, बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना रंगेहाथ पकडले. त्यांनतर एन.एन. जाधव मॅडम यांचे सुचने नुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा एन.एन.जाधव मॅडम यांनी अनिल अहिरे व शैलेंद्र पाटील यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांनी प्रथम अनिल अहिरे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल रामचंद्र अहिरे, वय ५१, व्यवसाय नोकरी,सहायक फौजदार,ब.नं.२७२७ नेमणुक चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन रा.वैष्णवी पार्क,प्लॉट नं. ४, धुळे रोड,चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव मुळ रा.खेडी खेडगाव ता.चाळीसगांव ता.चाळीसगांव(खाते पोलीस वर्ग–३) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने अनिल अहिरे यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर एन.एन.जाधव मॅडम यांनी शैलेंद्र पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शैलेंद्र आत्माराम पाटील,वय ३८, व्यवसाय नोकरी, पोलीस नाईक,ब.नं.७४४ नेमणुक चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन रा.वैष्णव पार्क, तेजस कोनार्क, धुळे रोड,चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव (खाते पोलीस वर्ग–३) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने शैलेंद्र पाटील यांना देखील ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई जळगांव येथे जावुन अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयात करण्यात आली.सदर कार्यालयातील एका रुममध्ये माझे,आरोपी अनिल अहिरे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी क्रं.१ अनिल रामचंद्र अहिरे,सहायक फौजदार,ब.नं.२७२७ व आरोपी क्रं.२ शैलेंद्र आत्माराम पाटील, पोलीस नाईक,ब.नं.७४४ दोन्ही नेमणुक चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन दि.२८.०६.२०२२ रोजी माझे मुलीने दाखल केलेल्या गुन्हयात योग्य ती मदत करुन गुन्हयाचा तपास लवकरात लवकर व मुलीचे बाजुने करुन सदर गुन्हयात आरोपींविरुध्द कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करण्याच्या मोबदल्यात माझेकडे पंचासमक्ष प्रथम ५,०००/–रु. व तडजोडीअंती ४,०००/– रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम आरोपी क्रं.२ यांच्या उपस्थितीत आरोपी क्रं.१ यांनी दि.२८.०६.२०२२ रोजी १९.०३ वा.चाळीसगांव शहरातील सिग्नल पॉईन्टला म्हणजेच मनमाड चौफुलीवरील शिवाजी महाराज चौकात स्वत:स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी क्रं.१ अनिल रामचंद्र अहिरे,सहायक फौजदार,ब.नं.२७२७ व आरोपी क्रं.२ शैलेंद्र आत्माराम पाटील, पोलीस नाईक,ब.नं.७४४ दोन्ही नेमणुक चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

(signature)

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही
दि.२९.०६.२०२२
(signature)
पांडुरंग पितांबर पाटील